# सुधारीत गुंतवणूक धोरण

**( Investment policy ) २०२२-२३**

## 1) प्रास्ताविक :- (Instroduction)

भारत सरकारच्या अर्थ व पतधोरणाप्रमाणे त्या संदर्भात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मास्टर परिपत्रकाप्रमाणे व बँकींग रेग्युलेशन अॅक्टच्या कलम १८ प्रमाणे मागणी व मुदत देयतेच्या ३% **CRR (Cash Reserve Ratio)** व कलम २४ प्रमाणे १८ % **SLR(Statutory Liquid Ratio)** ठेवावा लागतो. म्हणजेच बँकेस एकूण मागणी व मुदत देयतेच्या ३ % **CRR** स्वत:कडे रोख स्वरुपात किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राज्य सहकारी बँक किंवा रिझर्व्ह बँकेने निर्देशित केलेल्या बँकेत करंट खाती ठेवावा लागतो. तसेच बँकेस एकूण मागणी व मुदत देयतेच्या किमान १८% रक्कम मागताक्षणी परत करता याव्यात म्हणून लिक्वीड असेटमध्ये गुंतवावी लागते. म्हणजेच ही गुंतवणूक सरकारी रोखे, टस्टी सिक्युरिटीज व रिझार्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या इतर सिक्युरिटीजमध्ये मुदत ठेवीमध्ये गुंतवावी लागते. रिझर्व्ह बँकेने सरकारी रोख्यांमध्ये सध्या एकुण एन.डी.टी.एल. च्या १८ % इतकी गुंतवणूक करणे अनिवार्य आहे. त्यानुसार तरलतेसाठी आवश्यक गुंतवणूक सरकारी रोख्यामध्ये करणेत यावी. तसेच त्याचे वर्गिकरण , मुल्यांकन, खरेदी विक्री व्यवहार, तरतुद या सदर्भात वेगवेगळी मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. याशिवाय अतिरिक्त निधीची सुरक्षित व फायदेशिर गुंतवणूक रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकास पात्र राहून विविध ठिकाणी करावी लागते. या सर्वासाठी बँकेने स्वत:चे गुंतवणूक धोरण ठरविले आहे व ते अंमलात आणले आहे. सदर गुंतवणूक धोरणाचा प्रतिवर्षी अगर आवश्यकतेनुसार फेर आढावा घेणे आवश्यक असते. त्यानुसार गुंतवणूक धोरणांचा फेरआढावा घेवून खालील मुद्यांचा समावेश असलेले गुंतवणूक धोरण तयार करणेत आले असून ते अंमलात येईल.

१) गुंतवणुकीची आवश्यकता व उद्देश.

२) गुंतवणूक कोठे, किती, केंव्हा करावयाची याचा तपशिल त्याचे सर्वसाधारण धोरण तपशिल.

३) रिझर्व्ह बँक नियमाप्रमाणे सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणूक करुन जादा गुंतवणूक त्यातच करावयाची किंवा जिल्हा बँक इ. ठिकाणी करणे.

४) केंद्र सरकार कर्जरोखे, राज्य सरकार कर्जरोखे, ट्रेझरी बिल,(GOI, SDL, T.BILL) जिल्हा

बँक, राज्य बँक याशिवाय इतर, राज्य सरकार बॉण्डस् इ. मध्ये करावयाची काय? याचे प्रमाण.

५) गुंतवणुकीचे वर्गिकरण, मुल्यांकन, तरतुद इ.

६) गुंतवणूकीची तपासणी, ऑडीट, त्याचे रिपोर्टिंग.

७) गुंतवणुकीचे अधिकार व जबाबदारी ठरविणे.

८) गुंतवणुकीची खरेदी, विक्री, त्यातील नफा/ तोटा याबाबत सूचना, प्रमाण निर्णय घेणे याबाबतचा तपशिल ठरविणे.

९) ब्रोकर यांचे पॅनेल तयार करणे, त्यांना मान्यता देणे.

१०) प्रत्येक विक्रीच्या व्यवहारामध्ये किती रक्कमेपर्यंत नुकसान सहन करणे ते ठरविणे

## 2) **आवश्यकता आणि उद्देश** (Objective & Requirement ) :-

बँकेकडील ठेव व अन्य देय रक्कमा याचा रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे हिशोब करुन येणारी नक्त मागणी व मुदत देय रक्कम (NDTL) यावर बँकिंग रेग्युरेशन ॲक्टमधील कलम १८ प्रमाणे कॅश रिझर्व्ह रेशो (CRR) किमान ३% आणि कलम २४ प्रमाणे वैधानिक तरल रेशो (SLR) रिझर्व्ह बँकेच्या दिनांक ०७.०६.२०१७व ०५.१२.२०१८ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे किमान खालील प्रमाणे ठेवावा.

| | | | |
|---|---|---|---|
| दिनांक ०२.०४.२०१६ पासून | २१.२५% | दिनांक १३.०४.२०१९ पासून | १९.००% |
| दिनांक ०९.०७.२०१६ पासून | २१.००% | दिनांक ०६.०७.२०१९ पासून | १८.७५% |
| दिनांक ०१.१०.२०१६ पासून | २०.७५% | दिनांक १२.१०.२०20 पासून | १८.५0% |
| दिनांक ०७.०१.२०१७ पासून | २०.५0% | दिनांक ०४.०१.२०२० पासून | १८.२५% |
| दिनांक २४.०६.२०१७ पासून | २०.००% | दिनांक ११.०४.२०२० पासून | १८.००% |
| दिनांक ०५.०१.२०१९ पासून | १९.२५% | | |

याशिवाय कर्ज वितरण करुन काही अतिरिक्त निधी राहील तो रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकास पात्र राहून अन्यत्र गुंतवणे आवश्यक असते असे सर्व निधी गुंतविताना सुरक्षितता, तरलता, आणि जास्तीत जास्त उत्पन्न या तीन गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. वैधानिक गुंतवणूक करताना सरकारने मान्यता दिलेल्या सरकारी रोखे , बॉण्डस्, राज्य सरकार रोखे, इतर कर्ज रोखे , राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँक, व्यापारी बँका, राष्ट्रीयकृत बँका या ठिकाणी गुंतवणूक करता येते. याचा विचार करता गुंतवणूक धोरणाची तीन विभागात विभागणी राहील.

CRR – Cash Reserve Ratio
SLR – Statutory Liquidity Ratio
Other Investment

## 3) सी. आर.आर. (रोखता ) :- CRR

बँकेच्या दैनंदिन कामकाजाचे सोयीसाठी सी.आर.आर.(CRR) नक्त मागणी व मुदत देयते (NDTL) च्या किमान ३ % ठेवावा अशी BR Act – १९४९ कलम १८ मध्ये तरतूद आहे. आदर्श कमाल मर्यादा ६ % समजणेत आली आहे. तथापि विशिष्ठ कारणपरत्वे तात्पुरता यापेक्षा अधिक निधी ठेवणेआवश्यक असल्यास तो ठेवण्याचा अधिकार व्यवस्थापक/ उपव्यवस्थापक यांना राहील. सी.आर.आर. मध्ये बँकेकडील रोख शिल्लक व रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे विशिष्ठ बँकांतील करंट खात्यात असणारी शिल्लक रक्कम याचा समावेश असतो. याप्रमाणे सी.आर.आर. चे नियोजन करणेचे धोरण राहील.

### ३.१) रोख शिल्लक (CRR ):-

अ) सर्व शाखांना शाखावार कामकाजाचे प्रमाणात प्रत्यक्ष माहिती घेवून मा. संचालक मंडळाने /गुंतवणूक कमिटीने रोख शिल्लक मर्यादा ठरवून द्यावी.(Cash Retaining Limit)

ब) गरजेनुरुप शाखेचे विनंतीवरुन त्यात बदल करणेचा अधिकार गुंतवणूक कमिटी / कार्यकारी समितीस राहील.

क) शाखेकडील प्रत्यक्ष रोख शिल्लक मर्यादेचे उल्लंघन झाल्यास त्यास मा. शाखा समितीची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

### ३.२) बँक शिल्लक (CRR ) :-

CRR साठी बँकेच्या कार्यक्षेत्रातील शाखांचे ठिकाणी, जिल्ह्याचे ठिकाणी, अगर निधी नियोजनाचे सोयीसाठी डी.सी.सी. बँका, राज्य सह. बँक व राष्ट्रीयकृत बँकांमध्ये करंट खाती उघडता येतील.

अ)कामकाजाच्या क्लिअरींगचे व ए.टी.एम. च्या सोयीसाठी सर्व शाखांचे ठिकाणी , जिल्ह्याचे ठिकाणी, तसेच पुणे, मुंबई अशा सोयीच्या ठिकाणी, डी.सी.सी.,एम.एस.सी., आय.डी.बी.आय.,बँकांमध्ये आवश्यकतेनुसार करंट खाती उघडून त्यात आवश्यकतेनुसार रक्कम ठेवावी.

ब) कामकाजाचे सोयीनुरुप शाखाचे अगर अन्य ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकांत करंट खाती उघडून त्यात गरजेनुसार रक्कम ठेवणेत यावी.

क) स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय. कडील करंट खाते निधी नियोजनाच्या दृष्टीने व सोयीच्या दृष्टीने फायदेशिर ठरत असल्याने सदर खात्यावर जास्तीत जास्त शिल्लक ठेवावी.

### ३.३) बँक खाती (Non CRR ) :-

CRR साठी पात्र असणाऱ्या खात्याशिवाय क्लिअरींगचे / डी.डी. व्यवहाराचे/ निधी नियोजनाचे सोयीसाठी शेड्युल्ड / कमर्शिअल बँकांमध्ये खाती उघडून त्यात कामाचे सोयीनुरुप बॅलन्स ठेवणेत यावा. त्यावर ॲट पार डी.डी./ चेक सोय उपलब्ध करुन घ्यावी. सध्या सर्व शाखांसाठी कल्लाप्पाण्णा आवाडे इचल. जनता बँक इचलकरंजी, जयसिंगपूर, सांगली, एन.के.जी.एस.बी. बँक शाखा इचलकरंजी, एच.डी.एफ.सी.बँक पुणे,

इचलकरंजी, आय.सी. आय.सी.आय. या बँकेमध्ये खाते उघडून डी.डी./ ॲट पार चेक,/ आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी/ ची सुविधा उपलब्ध केली आहे.

वरीलप्रमाणे सर्व शाखामध्ये रोख शिल्लक, बँक बॅलन्स, इतर खात्यातील बॅलन्स व आवश्यक सी.आर.आर. ठेवणेची जबाबदारी तसेच यासंबंधी आर.बी.आय. कडे माहिती पाठविणेची जबाबदारी व्यवस्थापक/ उपव्यवस्थापक यांची राहील. त्यांनी योग्य ते दैनंदिन निधी नियोजन करावे त्यांना याबाबत आवश्यक ते अधिकार राहतील.

4) **तरलता (SLR ):-**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक तत्वाप्रमाणे एकुण एन.डी.टी.एल. (NDTL) चे किमान १८ % इतकी गुंतवणूक सरकारी कर्ज रोख्यांमध्ये, मान्यताप्राप्त रोख्यांमध्ये करणे अनिवार्य केले आहे. त्याप्रमाणे सरकारी रोख्यांमध्ये बँकेने ज्या त्यावेळच्या एन.डी.टी.एल. चे किमान १८% गुंतवणूक करावी. याशिवाय अतिरिक्त निधी असतील, गुंतवणूक अधिक फायदेशिर असेल तर १८% पेक्षा अधिक गुंतवणूक करावी. सध्या सरकारी रोखेचे ट्रेडींग मार्केट सर्वेक्षणानुसार करणेचे धोरण राहील. अशी गुंतवणूक करताना त्यातील अधिकतर रक्कम भारत सरकारचे कर्जरोख्यांमध्ये गुंतवणेत यावी.

बँकेची दिनांक ३१.३.२०२० रोजी ॲप्लीकेबल मागणी व मुदत देयता (NDTL) १२५८२.१४ लाख इतका असून वैधानिक तरलता (SLR) १८% प्रमाणे किमान २२६४.७९ इतकी गुंतवणूक करणे आवश्यक असता बँकेने सरकारी रोख्यात ३९८४.२१ लाख इतकी वैधानिक तरलतेसाठी केलेली आहे. आपल्या बँकेची सरकारी रोख्यामध्ये ३९८४.२१ लाख इतकी गुंतवणूक असून त्याचे प्रमाण ३३.२४ % इतके येते. SLR साठी आवश्यक HTM या प्रकारात गुंतवणूक करावी. जादाची गुंतवणूक AFS/ HFT या प्रकारात करावी. सदरची गुंतवणूक करताना रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार सदर गुंतवणूकीची विगतवारी (Classification) खरेदी करतानाच ठरविण्यात यावी. आपल्या बँकेने दिनांक ३१.३.२०२० अखेर सरकारी रोख्यामध्ये रु. ३९८४.२१ लाख केलेले गुंतवणुकीचा व्याज दर ६.५७% पासून ८.८० % पर्यंत आहे. बँकेच्या कर्जाचा व्याजदर १५.00% असल्याने जास्तीत जास्त नफा मिळविणेसाठी सरकारी रोख्यामधील जादा केलेल्या गुंतवणुकीची विक्री करता येईल. याबाबत सरकारी रोख खरेदी विक्रीचे निर्णय घेण्याचे अधिकार बँकेचे व्यवस्थापक श्री. जिवंधर भाऊ चौगुले, अधिकारी श्री. संतोष भरमू रायनाडे या दोघापैकी कोणाही एकास राहतील तसेच खरेदी विक्री व्यवहाराचे डिल कन्फरमेशनवर सही करण्याचा अधिकार खालीलपैकी कोणत्याही दोघांचे संयुक्त सहीने राहतील.

| अ.नं. | अधिका-याचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. जिवंधर भाऊ चौगुले | सी.ई.ओ. |
| २ | श्री. निलेश दादासो बागणे | मॅनेजर |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री. संतोष भरमू रायनाडे | चेकर |

तसेच सरकारी रोखे खरेदी विक्री डिल स्लीप वरुन डिल कन्फरमेशन तयार करणे, जमा खर्च करणे,रजिस्टर ठेवणे, फॅक्स करणे, खरेदी विक्रीसाठी आवश्यक निधीचे नियोजन करणे सदरचे व्यवहार बँकेच्या एच.डी.एफ.सी. च्या सी.एस.जी.एल. खात्यामार्फत करणे, तसेच एम.एस.सी.बँक, व संबंधित काऊंटर पार्टी यांना विहित वेळेत कळविणे इत्यादी कामाची जबाबदारी खालील सेवकांची राहील.

| अ.नं. | अधिका-याचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.संतोष भरमू रायनाडे | इडीपी मॅनेजर |
| २ | श्री. प्रशांत महावीर बरगाले | लिपिक |

वरीलपैकी कार्यालयीन सोयीसाठी कोणत्याही सेवकाची बदली झाल्यास त्याचे जागी येणारे कर्मचारी सदरचे काम पाहतील. सदरच्या केलेल्या विक्री व्यवहारास लगतच्या संचालक मंडळाच्या / गुंतवणूक कमिटी मध्ये मंजुरी घेणेत यावी. सरकारी रोखे व्यवहार T + 1 या पध्दतीने होतील. खरेदी करताना व्याजाचा जमा खर्च येणे व्याज खाती करावा. सरकारी रोख्याची विक्री केल्यानंतर व्याजाचा जमा खर्च सरकारी रोखे गुंतवणूकीवरील येणे व्याज व मिळालेले व्याज खाती करावा.. म्हणजेच ज्या दिवशी खरेदी अगर विक्री केली जाईल. त्यापुढील कामाच्या दिवशी सेटलमेंट पूर्ण होईल व जमा खर्च सदर दिवशी पूर्ण केला जाईल. सरकारी रोखे गुंतवणूकीवरील व्याज नफा तोटा पत्रकास सरकारी रोखे गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज खाती जमा घ्यावे.

दैनंदिन चढ उतार/ बदल यावर लक्ष ठेवणेची जबाबदारी मॅनेजर/ ॲसि. मॅनेजर यांची राहील. दैनंदिन बाजाराचा अंदाज घेवून रोखे / बॉण्डची खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यात यावेत. हे व्यवहार सी.एस.जी.एल. (CSGL) अकौंटमधून व डिमॅटमधून करणेत यावेत. बाजारातील एकूण परिस्थिती पहाता जर एखाद्या रोखे विक्री व्यवहारामध्ये नुकसान सोसावे लागल्यास ते नुकसान सोसण्यात यावे व त्याची दखल लगतच्या संचालक मंडळ/ गुंतवणूक कमिटी मिटींगपुढे घेण्यात यावी. खरेदी करतानाच त्याची वर्गवारी निश्चित करणेत यावी.

एकुण गुंतवणूक खरेदी व्यवहार व त्यातील नफा तोटा इ. बाबतची माहिती दखलगिरीसाठी संचालक मंडळापुढे / गुंतवणूक कमिटीपुढे ठेवण्यात यावी.

5) **विक्रीची पध्दत** :-

बँकेकडे कोणत्याही एकावेळी किंवा वर्षात केव्हाही, रोख्यांची विक्री करताना,सर्वात प्रथम खरेदी केलेले रोखे प्रथम विकणे (एफ.आय.एफ.ओ.) किंवा सर्वात शेवटी खरेदी केलेले

रोखे प्रथम विकणे (एल .आय.एफ. ओ.) यापैकी कोणतीही पध्दत न वापरता ज्या त्या वेळेचे परिस्थितीप्रमाणे लॉट प्रमाणे विक्री करणेत यावी.

एकावेळी एकापेक्षा अधिक लॉट विकताना सरासरी पध्दतीने रोखे विकण्याचे स्वातंत्र्य बँकेला राहील. यातील एक किंवा अधिक रोखे विक्रीमध्ये तोटा आणि एक किंवा अधिक रोखे विक्रीमध्ये फायदा याची सरासरी करुन किमान फायदा शक्य तितका फायदा या तत्वावर विक्री करता येईल. प्रामुख्याने रु. ५ कोटी किंवा रु. ५ कोटीचे पटीत सरकारी रोखे खरेदी जरी बँकेचे धोरण असले तरी बँकेला जर योग्य वाटले/ किंवा फायदेशिर गुंतवणूक असली तर बँक भारत सरकार / राज्य सरकार यांचे रु. एक कोटी किंवा त्यापेक्षा / कमी / अधिक रक्कमेचे रोखे खरेदी व विक्री करेल किंवा अशी खरेदी कमी कालावधीसाठी / ठराविक कालावधीसाठी करता येईल.

6) **सरकारी रोखे वर्गीकरण (Categorization of Investment ) :-**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे परिपत्रक यु.बी.आय.डी. सी. / बी.एस.डी. आ. पीसीबी ४४/१२.५.05/२000- २00१ दि. २३.४.२00१ नुसार बँकांनी त्यांचेकडे असणाऱ्या रोखे - बॉण्डस् इ. गुंतवणुणीचे तीन प्रकारात वर्गिकरण करावे अशी सूचना केली आहे. सरकारी रोखे खरेदी करतानाच त्याचे वर्गिकरण निश्चित करणेत यावे व तशी नोंद बँकेच्या दप्तरी रेकॉर्डवरती करावी. सदरचे वर्गीकरण खालील तीन प्रकारामध्ये करावे.

अ) **हेल्ड टु मॅच्युरिटी :- (HTM )**

या प्रकारामध्ये बँकेने जे रोखे, बॉण्डस्, इ. खरेदी केले आहेत आणि ते त्या रोख्यांची , बॉण्डची मुदत संपेपर्यंत बँक स्वत:कडेच ठेवणार आहे. त्याची विक्री करणार नाही. असे रोखे / बॉण्डस् यामध्ये वर्गीकरण करणेत यावे असे वर्गीकरण सरकारी रोख्याची खरेदी करतानाच वर्गीकरण निश्चित करणेत यावे. अशा वर्गिकरणामध्ये बदल, वर्षाचे सुरवातीस संचालक मंडळ / गुंतवणूक कमिटीचे ठरावाने करता येईल. या विभागातील रोखे / बॉण्डस्ची एकूण रक्कम एकुण मागणी व मुदत देयतेच्या २५% पेक्षा अधिक असू नये. या बाबतीत रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी लागू केलेले निर्देश अंतीम राहतील.

**ब) अव्हेलेबल फॉर सेल (AFS ) :-**

बँकेने केलेल्या एकूण गुंतवणुकीपैकी ज्या रोखे / बॉण्डस् चा समावेश हेल्ड टु मॅच्युरिटी / हेल्ड फॉर ट्रेडींग या प्रकारात केलेला आहे. त्याशिवाय बाकी सर्व रोखे / बॉण्डस् यांचा समावेश या प्रकारात करता येईल. या प्रकारात समावेश केलेल्या रोखे / बॉण्डस्ची विक्री गुंतवणूक कमिटीचे पुर्व परवानगीने / कार्योत्तर मंजुरीने आवश्यक वाटेल त्यावेळी करता येईल. याचा निर्णय ज्या त्यावेळी परिस्थिती प्रमाणे घेणेत यावा. या

विभागात वर्गीकरण केलेल्या रोख्यांची रक्कम हेल्ड टु मॅच्युरिटी या भागात करावयाची असल्यास त्याला संचालक मंडळाची / गुंतवणूक कमिटीची मंजुरी घ्यावी लागेल. या विभागातील रोखे विक्रीमधून झालेला नफा / तोटा, सरकारी रोखे विक्रीमधील नफा तोटा खाती जमा खर्च करणेत यावा. या विभागामध्ये वर्गीकृत केलेल्या रोखे एकाच प्रकारचे अधिक प्रमाणात नसावेत. वेगवेगळ्या व्याजदराचे व मुदतीचे रोखे असावीत. अशी काळजी शक्यता घेणेत यावी.

**(क) हेल्ड फॉर ट्रेडींग (HFT):-**

निधी नियोजनाचे सोयीसाठी व नियमितपणे खरेदी विक्रीच्या उद्देशाने घेतलेल्या सरकारी रोख्याचा समावेश या श्रेणीत राहील. याबाबतचे अधिकार व्यवस्थापक व उपव्यवस्थापक यांना राहतील. ज्या सरकारी रोख्यांची रोजचे मार्केटमध्ये खरेदी - विक्री होते अशा लिक्विड सरकारी रोख्यांचा समावेश यामध्ये करावा. या विभागात वर्ग करण्यात आलेले रोखे जास्तीत जास्त ९० दिवसाचे आत विकले जाणे आवश्यक आहेत.अन्यथा ते आपोआप ॲव्हेलेबल फॉर सेल (AFS) या विभागात पुन्हा वर्ग होतील अशा वेळी संपुर्ण गुंतवणुकीचे संचालक मंडळ /गुंतवणूक कमिटीचे मंजुरीने पुन्हा नवीन वर्गीकरण करण्यात यावे. ॲव्हेलेबर फॉर सेल या विभागातील रोखे हेल्ड फॉर ट्रेडींग या विभागात संचालक मंडळात / गुंतवणूक कमिटीचे ठरावाने वर्ग करता येईल.

7) **मुल्यांकन** :-

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी परिपत्रकाद्वारे (युबीडी सीओ/ बी.एस.डी.आय. पीसीबी - ४४/१२.५.०५/२०००-२००१ दि. २३.४.२००१) ने बँकांनी केलेल्या अत्रह्ड/कम्रद्ध या वर्गवारीतील गुंतवणुकीचे (सरकारी, राज्य सरकार, बॉण्डस् इ. ) दरमहा मुल्यांकन करणेविषयी सूचना केल्या आहेत. त्यानुसार बँकेने केलेल्या गुंतवणुकीचे मुल्यांकन फिमडा / पी.डी.ए. आय. यांचेकडून जाहीर होणाऱ्या बाजार भावाप्रमाणे करावे व त्यास संचालक मंडळाची मान्यता घ्यावी. आवश्यक ठराव मंजूर करुन घ्यावा. वर्ष अखेर जे मुल्यांकन केले जाईल त्यापैकी ज्या गुंतवणूकीमध्ये नफा दिसून येतो त्याचा जमा खर्च करणेत येवू नये. परंतु ज्या रोख्यात तोटा दिसत आहे (खरेदी दर बाजारभावापेक्षा अधिक असलेमुळे) अशा तोट्यात असणाऱ्या अत्रह्ड/ कम्रद्ध या वर्गवारीतील रोख्याची तरतुद रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे खउ्र खाती करावी. IDR तरतुद त्या वर्षाचे नफा - तोटा मधून करणेत यावी. अशी तरतुद करताना पूर्वी केलेल्या तरतुदीचा विचार करुन आवश्यक तरतुद कमी जास्त करावी.

जे सरकारी रोखे कढ्च या प्रकारात वर्ग केलेले आहेत. त्याची तरतुद सरकारी रोख्याचा उर्वरित कालावधी विचारात घेवून त्याचे प्रमाणात वर्षाअखेरीस प्रिमियम नफातोटा खाती खर्ची टाकून निर्लेखीत करणेत यावा.

याशिवाय गुंतवणूक चढ - उतार निधीची (IFR) ची आवश्यकतेनुसार अगर जादा तरतुद करणेचा अधिकार वार्षिक सभेस राहील. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे HFT / AFS वर्गीकृत सरकारी रोखे गुंतवणुकीच्या ५ % इतका निधी पूर्ण करणे आवश्यक आहे. बँकेने सध्या या प्रकारात अल्पशा गुंतवणूक केलेली आहे. बँकेने दि. ३१.३.२०२० अखेर रु. ४३ लाख IFR व IDR रु. २२ लाख इतका निर्माण केला असून रिझर्व्ह बँकेच्या सूचनेप्रमाणे पालन केले आहे. यापुढेही आवश्यक ती योग्य तरतुद करुन रिझर्व्ह बँकेच्या सूचनेचे पालन करावे.

8) **सरकारी रोखे ऑडीट :-**

बँकेने केलेल्या सर्व प्रकारच्या गुंतवणुकीची तपासणी व अहवाल बँकेने नेमलेल्या चार्टड अकौंटंट यांचेकडून तिमाही करुन घेणेत यावी. अशा तपासणीमध्ये खालील बाबींचा तपासणी अहवाल घेणेत यावा आणि असा अहवाल व गुंतवणुकीचा सर्व तपशिल नियमाप्रमाणे प्रत्येक तिमाही नंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे पाठविणेत यावा.

१) बँकेचे गुंतवणुकीचे व्यवहार हे बँकेच्या खातेमधून केलेले आहेत किंवा नाही ते पहाणे.
२) बँकेने एकुण केलेल्या गुंतवणुकीबाबतची माहिती घेणे.
३) सरकारी कर्जरोखे व इतर मान्यताप्राप्त गुंतवणुकीचे दर तिमाही किंमतीकरण / मुल्यांकन (व्हॅल्युएशन ) करुन घेणे.
४) बँकेने केलेली गुंतवणूक रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे आहे की नाही ते पहाणे.
५) बँकेने केलेले रोखे खरेदी विक्रीचे व्यवहार हे एस.जी.एल. मधून केलेले आहेत किंवा नाही ते पहाणे.
६) बँकेने केलेले खरेदी विक्रीचे व्यवहार बँकेने नेमलेल्या अधिकृत ब्रोकर मार्फत केलेले आहेत की नाही ते पहाणे.
७) बँकेने बँक रिसीट काढलेली नाहीत किंवा स्विकारलेली आहेत का नाही ते पहाणे.
८) बँकेने गुंतवणूकीवर अंतर्गत नियंत्रण ठेवलेले आहे की नाही ते पहाणे.
९) बँकेने जाहीर वायदा लेन देन व्यवहार केलेले आहेत की नाही ते पहाणे.
१०) बँकेने व्यापारी पत्र व जमा प्रमाणपत्रामध्ये गुंतवणूक केलेली आहे की नाही ते पहाणे.
११) बँकेने गुंतवणूकीबाबतचे वेगवेगळे रजिस्टर ठेवलेली आहेत की नाही ते पहाणे.

9) **Non SLR – Investment :-**

रिझर्व्ह बँकेचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे छेप डडठ गुंतवणूक कोणत्याही वेळी गत वर्षीच्या एकूण ठेवीच्या १० % पेक्षा जास्त असू नये. छेप डडठ गुंतवणुकीचे धोरण खालीलप्रमाणे राहील.

A) Mutual Fund :-

बँकेस अतिरिक्त निधीची गुंतवणूक रिझर्व्ह बँकेचे मार्गदर्शक सूचना प्रमाणे Mutual Fund मध्ये करता येईल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्याआदेशानुसार, नियमाप्रमाणे गुंतवणूक सरकारी रोख्यामध्ये करण्यात आल्यानंतर बँकेकडे राहणारे अतिरिक्त निधी दैनंदिन शिल्लक ठेवावी लागणारी बँक शिल्लक यांचा आढावा घेवून अतिरिक्त रक्कमेवर व्याज मिळणेसाठी दैनंदिन पातळीवर र्चीीिंरश्र ऋीपव मध्ये गुंतवणूक करण्यात यावी.

गरजेनुसार अन्य Mutual Fund मध्ये गुंतवणूक करणेत येईल. एका Mutual फंडात डळपसश्रश Exposure चे मर्यादेपर्यंतच गुंतवणूक करता येईल. त्यापेक्षा अधिक गुंतवणूक करु नये. यासाठीची आवश्यक खाती संचालक मंडळ / गुंतवणूक कमिटीचे मंजुरीने उघडता येतील. वर्षअखेरीस म्हणजे दिनांक ३१ मार्च रोजी Mutual Fund मध्ये गुंतवणूक ठेवू नये असे धोरण राहील. सदर गुंतवणुकीवर मिळणारे व्याज गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज खाती जमा घ्यावे. याबाबतचे कोणतेही निर्णय घेणेचे अधिकार व्यवस्थापक / उपव्यवस्थापक यांना राहतील.

१०)**Inter Bank Deposit :- (Placement of Deposit** )

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मार्गदर्शक सूचनेप्रमाणे अतिरिक्त निधीची अन्य बँकांमध्ये गुंतवणूक करता येईल. याची कमाल मर्यादा गतवर्षीच्या ठेवीच्या २०% इतकी राहील.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे आदेशानुसार नियमाप्रमाणे गुंतवणूक सरकारी रोख्यांमध्ये करण्यात आलेनंतर बँकेकडे राहणारे अतिरिक्त निधी दैनंदिन शिल्लक ठेवावी लागणारी बँक शिल्लक यांचा आढावा घेवून जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये अल्पमुदत / मध्यममुदत ठेवीमध्ये गुंतवावी, तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय. बँक, बँक ऑफ बडोदा, किंवा इतर राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका, शेड्युल्ड सहकारी बँका या ठिकाणी अल्पमुदत, मध्यम मुदत मध्ये गुंतवणेत यावेत. अशी गुंतवणूक करताना रिझर्व्ह बँकेच्या याबाबतच्या कमाल मर्यादा मागील वर्षाच्या एकुण ठेवीच्या २० % चे काटेकोरपणे पालन करावे तसेच अशी गुंतवणूक मागील वर्षीच्या एकुण ठेवीच्या ५ % पेक्षा अधिक एका बँकेत करु नये.सदर गुंतवणूक विचारात घेताना संबंधित बँकेतील सर्व प्रकारच्या गुंतवणुकीचा समावेश राहील.

दिनांक ३१.३.२०२० अखेर बँकेने अतिरिक्त निधीची राष्ट्रीयकृत / व्यापारी/ शेड्युल्ड सहकारी बँकेत एकूण रु.९४७.५१ लाख गुंतवणूक केली आहे. ठेवीमध्ये वाढ

होत आहे. तसेच कर्ज वसुली चांगली होत आहे. मात्र त्या प्रमाणात कर्जास मागणी येत नाही. तरीही अतिरिक्त निधी राहिल्यास अगर कर्जास मागणी पुरेसी नसल्यास सन २०२०- २१ या वर्षात नवीन गुंतवणूक व काही गुंतवणुकीचे नुतनीकरण करावे. मार्च २०२१ वर्ष अखेरीस सुमारे ३० कोटी इतकी गुंतवणूक राहील असे अपेक्षित आहे. बँकेने सन २०२० - २१ या आर्थिक वर्षात ठेवीचे रु. १५० कोटी व कर्जाचे कोटी इतके उद्दीष्ट ठेवलेले आहे. सन २०२० - २१ या आर्थिक वर्षातही कर्जव्यवहार वाढणे अपेक्षित आहे. त्यामुळे कर्ज मागणीचा आढावा घेवून आवश्यकतेनुसार NON SLR मध्ये (Mutual Fund + Inter Bank Deposit ) असणारी गुंतवणूक अगर इतर बँकांत असणारी गुंतवणूक मुदतपुर्व परत घेता येईल. म्हणजेच कर्जाचे मागणीचा विचार करुन राष्ट्रीयकृत / व्यापारी / शेड्युल्ड सहकारी, जिल्हा मध्यवर्ती बँका व इतर बँकांमध्ये असणाऱ्या मुदत ठेवी मधील गुंतवणूक मुदतपूर्व परत घेता येईल. रिझर्व्ह फंड गुंतवणूक वेळोवेळी पूर्ण असणेची दक्षता घ्यावी असे धोरण ठरले. याबाबतचे निर्णय घेणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापक/ उपव्यवस्थापक यांना राहील.

११) **शेअर्समधील गुंतवणूक** :-

सध्या आपल्या बँकेची खालीलप्रमाणे शेअर्स मध्ये गुंतवणूक आहे.

- कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. - रु. १० हजार.
- महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई - रु. १ हजार.

बँकेने कर्ज घेतल्यास त्याचे प्रमाणात शेअर्स लिंकींग भरावे. तथापि त्याशिवाय अन्यत्र कोठेही शेअर्समध्ये गुंतवणूक करुन नये असे धोरण राहील. शेअर्स वरील मिळालेला डिव्हीडंड,डिव्हीडंड खाती जमा घ्यावा. मागील आर्थिक वर्षाचा डिव्हीडंड जमा न झालेस सदर गुंतवणूक वर्षाअखेरीस Non Performing Investment समजण्यात यावी.

१२) **गुंतवणुकीचे अधिकार व जबाबदारी ठरविणे** :-

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सरकारी रोखे गुंतवणूक, (GOI, SDL, T.Bills securities ), Inter Bank Investment, Mutual Fund Investment, अगर अन्य कोणत्याही प्रकारची गुंतवणूक करण्याचा अधिकार व्यवस्थापक / उपव्यवस्थापक यांना राहील. याबाबत वेळोवेळी आढावा घेवून सदर अधिकार वाढविणे अगर कमी करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

१३) **ब्रोकरचे पॅनेल तयार करणे** :- **(Broker Panel )**

दैनंदिन बाजारातील माहिती मिळविणे, रोखे खरेदी विक्रीसाठी इतर संस्था / बँका इ. संस्था शोध घेणे यासाठी रिझर्व्ह बँकेच्या व सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार बँकेच्या पॅनेलवर ब्रोकरची नेमणूक करताना रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात यावी. सर्वसाधारण ब्रोकर नेमताना शक्यतो खालील निकष पहाण्यात यावेत.

१) ब्रोकर हा एन.एस.ई किंवा बी.एस.ई. एन.पी. सी.ई.आय. मेंबर असावा.
२) एकूण कंपनीची नेट वर्थ चांगली असावी.
३) इतर कोण कोणत्या बँका किंवा इतर संस्था यांचे पॅनेलवर आहेत काय ते पहावे.
४) संबंधित ब्रोकरकडून मिळणारी माहिती ही योग्य व ग्राह्य आहे का ते पहावे.
५) ब्रोकरकडून दैनंदिन माहिती,बँकेस रोजच्या रोज मिळते का नाही ? व ते बँकेच्या नित्य संपर्कात असतात का ? राहू शकतील का ? इ. बाबतची खात्री करुन घेवून ब्रोकरना बँकेच्या पॅनेलवर घेण्यात यावे.

प्रत्येक ब्रोकर नेमताना त्यांचेबाबत रितसर ठराव ज्या त्या वेळच्या संचालक मंडळ / गुंतवणूक मिटींगमध्येकरण्यात यावा. एखाद्या ब्रोकरचे खात्यावर एका आर्थिक वर्षात खरेदी विक्रीची एकुण उलाढाल ५% पेक्षा जादा होत असेल तर त्याची दखल,कारण मिमांसा देवून नजीकच्या संचालक मंडळ / गुंतवणूक कमिटी मिटींगपुढे घेण्यात यावी. सदर पॅनेल प्रती वर्षी नवीन करण्यात येईल.

शक्यतो ब्रोकरचा वापर खरेदी किंवा विक्रीचे वेळी काऊंटर पार्टी शोधून देणे यासाठीच करावा. तसेच दोन्ही पार्टीचे सोईनुरुप डील झालेस कमाल ०.०५ पैसे दराने कन्सल्टन्सी फी देण्यात यावी. ब्रोकर मार्फत किंमत ठरवू नये अगर ठरविणेच्या प्रक्रियेत ब्रोकरचा सहभाग असणार नाही. याची काळजी घ्यावी.

ब्रोकरच्या पॅनेलमधून एखादा ब्रोकर कमी करणे, अथवा नवीन नेमणे इ. चा अधिकार संचालक मंडळास राहील.

ब्रोकरमार्फत केलेल्या व्यवहाराचे ब्रोकरेज शक्यतो ज्या त्यावेळी अगर दरमहा देणेचा अधिकार जनरल मॅनेजर, मॅनेजर, ॲसि. मॅनेजर यापैकी एक यांच्या सहीने आदा करणेत यावे

सर्व ब्रोकरना दिलेले ब्रोकरेज रक्कम एकत्रित तपशिलासह संचालक मंडळाच्या मिटींगपुढे दरमहा दखलगिरीसाठी ठेवण्यात यावी.

१४) **Portfolio Management :-**

बँकेकडे सरकारी रोखे अगर अन्य नवीन गुंतवणुकीचे क्षेत्रात तज्ञांचा सल्ला व मार्गदर्शन घेणेची गरज वाटल्यास ते घेता येईल. त्यांचे मार्गदर्शनानुसार गुंतवणूकीचे व्यवहार करता येतील. तथापि त्यापूर्वी त्यांचा अनुभव स्थैर्य, अन्य बँकांशी करार इ. बाबी तपासून घ्याव्यात. त्यांचेशी करार करणेच्या अटी ठरवून घ्याव्यात. त्यांचेशी करार करणेच्या अटी ठरवून घ्याव्यात. किती रक्कमेच्या गुंतवणुकीसाठी सल्ला घ्यावा याची मर्यादा ठरवावी व त्याबाबत सर्व बाजूने विचार करुन मा. संचालक मंडळाच्या मंजुरीने याबाबत निर्णय घेता येईल.तोपर्यंत फक्त यास धोरणात्मक मान्यता राहील.

१५) **NDS OM पोर्टल बाबत** :-

रिझर्व्ह बॅक ऑफ बँक इंडिया,मुंबई यांनी गव्हर्मेंट सिक्युरिटीजमध्ये खरेदी विक्रीचे व्यवहार बँकांना स्वतंत्रपणे करणेकरीता NDS OM हे इंटरनेट-बेस्ड वेब ऑप्लीकेशन तयार केलेले आहे. आपल्या बँकेचे CSGS अकौंट HDFC बँकेकडे असून त्यांचेकडून NDS OM पोर्टल वरून दैनंदिन खरेदी विक्रीचे व्यवहार करणेकरीता आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करून घेणेत यावी. तसेच NDS OM पोर्टलला लॉगईन होण्यासाठी USER ID व PASSWORD घेणेत यावेत बँकेला GSec मार्केटमध्ये होणारे दैनंदिन दराचे बदलाचा फायदा मिळविता यावा याकरीता चालू आर्थिक सालापासून NDS OM पोर्टल वरून GSec खरेदी विक्री (Bid/Offer) चे व्यवहार करावेत.

१६) **अनुत्पादीक गुंतवणूक (Non Performing Investment)** :-

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे गुंतवणुकीवर नियमाप्रमाणे व्याज / डिव्हीडंड न मिळाल्यास अशी गुंतवणूक अनुत्पादीत समजण्यात यावी. त्यावर नियमाप्रमाणे १०० % तरतूद गुंतवणूक घसारा निधीस करणेत यावी.

१७) **गुंतवणूक प्रकटीकरण(Investment Disclosure) :-**

बँकेने Non SLR मध्ये केलेली गुंतवणूक तसेच Non Performing गुंतवणूक ही बँकेच्या ताळेबंदामध्ये नोट म्हणून Annex III मध्ये प्रदर्शित करणेत यावे.

१८) **गुंतवणुकीवरील निर्बंध (Prohibition / Restrictions) :-**

१. झिरो कुपन बॉण्ड/ डिप डिस्काऊंट बॉण्ड यामध्ये गुंतवणुक करु नये.
२. बँक कोणत्याही स्वरुपाच्या म्युच्युअल फंडात, कंपनीच्या सम भागात गुंतवणुक करु नये.
३. NON SLR गुंतवणूक ही केव्हाही बँकेच्या मागील वर्षाच्या ठेवीच्या १०% पेक्षा जास्त असणार नाही.
४. बँकेने कर्ज रोख्याच्या buy – back व्यवस्थेस प्रतिबंध करु नये.
५. Restriction on holding shares in other co – op. societies setion 19 of BR Act 1949 AACS अंतर्गत जिल्हा मध्यवर्ती व राज्य सहकारी बँके व्यतिरिक्त अन्य सहकारी सोसायटीचे शेअर्स मध्ये रक्कम गुंतवणुक करु नये.
६. केवळ एक अथवा ठराविक दलालाकडून रोखे खरेदी - विक्रीचा व्यवहार करण्यात येऊ नये त्याच्यासाठी एक आचारसंहिता ठेवणेत यावी. (Broker Limit )
७. एका दलालाकडून वार्षिक खरेदी विक्रीच्या ५% पेक्षा जास्त व्यवहार करु नये.

येणेप्रमाणे बँकेचे गुंतवणुक धोरण (Investment Policy) २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता तयार केले असून सदर धोरणामध्ये गरजेनुसार आवश्यक ते बदल करणेचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील. सदर धोरणामध्ये दरवर्षी आढावा घेणेत येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी

कार्यालयीन (ऑफीस) शिफ ारशीप्रमाणे तयार केलेले बँकेचे गुंतवणुक धोरण (Investment Policy) २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता मा.संचालक मंडळ सभा क्र.०२ दि.२४/०५/२०२२ ठराव नं.३४ अन्वये मंजूरी देणेत आली.

चेअरमन